**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९६२ दि. ०९/०९/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर
## सराईत गुन्हेगार प्रविण ऊर्फ भैय्या प्रताप शिंदे याचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यातंर्गत कारवाई केलेबाबत.

सराईत गुन्हेगार नामे प्रविण ऊर्फ भैय्या प्रताप शिंदे, वय २२ वर्षे रा. ८८६, कसबा पेठ, पुणे याचेवर पुणे शहरातील फरासखाना, विश्रामबाग, शिवाजीनगर, समर्थ या पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रामध्ये खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, गंभीर दुखापत, अग्नीशस्त्र जवळ बाळगणे, गर्दी मारामारी या सारखे गंभीर गुन्हे दाखल असुन, त्याचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे फरासखाना पोलीस स्टेशन व आजुबाजुचे भागामध्ये त्याची प्रचंड दहशत निर्माण झाली होती. जनमाणसात भितीचे वातावरण निर्माण झालेले होते. त्यामुळे सर्व सामान्य नागरीक त्याचे विरुध्द तक्रारी देण्यासाठी धजावत नव्हते. त्याच्या या दहशतीला आळा घालण्यासाठी व सदर भागात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता त्याचे विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या (सुधारणा) अधिनियम सन २००९ चे कलम ३ प्रमाणे कारवाई करणेबाबत मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी आदेशित केलेले होते.

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी केलेल्या आदेशाप्रमाणे फरासखाना पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील सराईत गुन्हेगार नामे प्रविण ऊर्फ भैय्या प्रताप शिंदे, रा. ८८६, कसबा पेठ, पुणे याचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायदा कलम ३ प्रमाणे कारवाई करुन, त्याला एक वर्षाकरीता येरवडा जेल येथे स्थानबध्द करण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ पुणे शहर, श्री. प्रदिप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जगन्नाथ कळसकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे, श्री. नंदकिशोर शेळके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. यशपाल सुर्यवंशी, पोउपनि, पोलीस कर्मचारी अजय लोंढे, सचिन कुटे, पंकज देशमुख, अनिल गायकवाड, राजु देवकर यांनी केलेली आहे.

(जगन्नाथ कळसकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे